# हे भाषांतर फक्त मराठी भाषिकांच्या सोयीसाठी केले आहे. कोणत्याही त्रुटी, अस्पष्टता, भुलचुकी साठी इंग्रजीतील प्रत ग्राहय धरली जाईल.

**सामान्य सूचना :**

1.01 अर्ज करण्यापूर्वी, उम्मेदवाराने प्राथमिक अर्हता पडताळुन पाहणे. उम्मेदवाराची शैक्षणिक पात्रता अर्ज देण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत असणे गरजेचे आहे. ज्या व्यक्तिचा शेवटच्या वर्षाचा निकाल लागला नाही, अशा व्यक्तिंनीं अर्ज करु नये. जर उम्मेदवार रे.भ.बो. च्या भर्ती प्रक्रिया मधील कुठलीही अर्हता पूर्ण करित नसेल तर त्याचा अर्ज कुठल्याही क्षणी रद् करण्यात येईल.

1.02 ज्या उम्मेदवारानां रे.भ.बो. परिक्षेतून आजीवन किंवा ठराविक वेळेसाठी अडविले गेले आहे आणि त्यांचा हा अवधि पुर्ण झाला नाही, अशा उम्मेदवारानीं अर्ज करु नये. त्यांच्या रदद्बातल, अवधिबद्दल रे.भ.बो. ला जेव्हा कळेल त्यावेळी त्यांचा अर्ज रदद् केला जाईल.

1.03 उम्मेदवारानीं अर्ज आपल्या स्वतःच्या अक्षरात निर्धारित नमुन्यात आणि डाव्या हाताचा अंगठा निर्धारित जागेंवर लावुन भरणे आवश्यक आहे. अर्ज इंग्रजीत किंवा हिंदीतुन भरणे . अर्ज ए-4 बॉण्ड कागदावर (80 जी.एस.एम.) एकाच बाजुला करुन दिले जावेत. वर्तमानपत्रातील जाहीरातीत छापून आलेल्या कागदावरील अर्ज भरु नये. बाजारातुन छापून विकत घेतलेला अर्ज रोजगार सुचनेमध्ये प्रदर्शित केलेल्या नमुन्याप्रमाणे आहे याची पडताळणी अवश्य करावी. उम्मेदवार रोजगार समाचार मधें आलेल्या अर्जाची झेरॉक्स प्रत किंवा रे.भ.बो. च्या वेबसाईटवर दिलेल्या अर्जाची प्रत काढुन त्यावर अर्ज करु शकतो. विस्तृत रोजगार सुचना रे.भ.बो. च्या कार्यालयातील नोटिस बोर्ड वर लावली गेली आहे. उम्मेदवारचे अर्ज निर्धारीत वेळेच्या आधी दिले किंवा पोहचले पाहिजेत. रे.भ.बो. उशीराने किंवा चुकीने गहाळ झालेल्या अर्जाची जवाबदारी घेणार नाही.

1.04 उम्मेदवाराला अर्ज तथा त्यासोबत असलेल्या सूचना पत्रावर निर्धारीत जागी इंग्रजी तथा हिंदीत स्वाक्षरी करावी. अर्ज, सूचना पत्र, उत्तर पत्रिका, प्रश्न पत्रिका तथा विविध जागी स्वाक्षरी एक सारखी असावी. स्वाक्षरी कॅपीटल लेटर मधे करु नये.

अर्ज देतेवेळी किंवा परिक्षेच्यावेळी किंवा सर्टिफिकेट पडताळणीच्या वेळी स्वाक्षरीत बदल आढळल्यास  उम्मेदवारीं रदद् केली जाईल.

1.05 एका पदासाठी एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास असे अर्ज रदद्बातल ठरविले जातील,

1.06 जन्म तारखेसाठी मॅट्रीक्युलेशन /हायस्कुल परिक्षा प्रमाणपत्र तथा समांतर प्रमाणपत्र ग्राहय धरलें जाईल.

1.07 अर्जाच्या शेवटच्या तारखेपर्यंत, सुरक्षा दलातील भुतपूर्व सैनिक, वर्षभराच्या कालावधीत सेंवानिवृत्त होणारे अर्ज करु शकतात.

1.08 भुतपुर्व सैनिक, आणि अपंगांसाठी राखीव पदे वेगळी न देता, एकुण पदांमधे दर्शविली आहेत.

1.09 रोजगार सुचनेमध्ये दिलेली पदे अंतिम आहेत तथा रेल्वे प्रशासन आवकश्यकतेनुसार पदांची संख्या रदद् करण्याचा अधिकार राखुन ठेवत आहेत आणि तो सर्वांसाठी लागु होईल अशा स्थितीत परिक्षा शुल्क परत केले जाणार नाही.

1.10 सर्व परिक्षांच्या तारखा तथा परिक्षांचे निकाल रोजगार समाचार आाणि स्थानीक दैनीक वर्तमानपत्रात प्रकाशित केले जातात.  अशा सुचना रे.भ.बो. च्या वेबसाईटवर ही माहिती साठी उपल्ब्ध आहेत.  लेखी /ऑनलाइन परिक्षेसाठी चे कॉल लेटर उम्मेदवाराला पोस्टाने पाठविले जाते.  ज्या उम्मेदवाराचे अर्ज फेटाळण्यात आले आहेत, त्यांनाही कारणे सुचित केली जातात.  कुठल्याही पदासाठी अपात्र उम्मेदवारांची माहिती लेखी तथा ऑनलाइन परिक्षे पूर्वी कमीत कमी एक आठवडया आधी रे.भ.बो. च्या वेबसाईटवर मिळु शकते.  परिक्षेचे कॉल लेटर न मिळाल्यास तथा अर्ज फेटाळण्या संबंधी सूचना वेळेवर न मिळाल्यास रे.भ.बो. जवाबदार रहाणार नाही.  रे.भ.बो.  लेखी तथा ऑनलाईन परिक्षेत असफल झालेल्या उम्मेदवारांना सुचना देण्यास रे.भ.बो. बाध्य नाही.

1.11 रे.भ.बो.  ने निवडलेल्या उम्मेदवारांना रेल्वे  भर्ती साठी कुठलाही अधिकार प्राप्त नाही.  रे.भ.बो. योग्य उम्मेदवारांची नावे संबंधीत क्षेत्रीय रेल्वे तथा उत्पादन शाखांच्या मुख्य कार्मिक अधिका-यांकडे पाठवितो जिथुन नियुक्ति संबंधी चे सर्व पात्रता नियम पडताळुन तथा पदांच्या उपलब्धतेनुसारत्यांना नियुक्तिचे पत्र दिले जाते.

1.12 निवडलेल्या उमेदवारांना जिथे नियुक्त केले आहे तिथे कामाचे (गरजेप्रमाणे) प्रशिक्षण घेणे बंधनकारक आहे

1.13 नियुक्तिनंतर उम्मेदवाराला प्रत्येक पदासाठी दर्शविलेल्या वेतनश्रेणी नुसार वेतन तथा अन्य भत्ते लागु होतात.  प्रशिक्षण घेतांनां प्रशिक्षण भत्ता त्यांना देय होतो.

जरुर पडल्यास काही उम्मेदवारांना जमानत रक्कम किंवा इन्डेमिनीटी बॉन्ड दयावा लागतो.

1.14 अनारक्षित पदांसाठी कुठल्याही समुंदयातील उम्मेदवारांचा विचार केला जाऊ शकतो . पण अनुसुचित जाति/अनुसुचित जनजाति /अन्य मागास वर्गीयांच्या राखीव पदांसाठी त्याच जातीच्या किंवा समुंदयाच्या उम्मेदवारांचा विचार होतो. या साठी उम्मेदवारांनी अनुलग्नक -3 (केवळ अ.जा./अ.ज.जा.उम्मेदवारांसाठी) तथा अनुलग्नक -4 (केवळ अन्य मागास वर्गीयांसाठी) मधे दिलेल्या जातीच्या नमुन्यानुसार सक्षम अधिका-याची स्वाक्षरी असलेले जातीचे प्रमाणपत्र देणे जरुरी आहे. या व्यतिरिक्त अन्य मागास वर्गीय उम्मेदवारांसाठींच्या जाती पत्राच्या विहीत नमुन्यात भारत सरकारच्या कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाच्या दिनांक 8.9.93 चा का.जा.सं. 3601/2/22/9-स्था. (एस.सी.टी.) तथा त्या नंतर संशोधन करण्यासाठी दिनांक 09.03.2004 ची का.जा. स. 36033/3/2004 - स्था. (आर.ई.एस.) ची अनुसुचि च्या कॉलम 3 मध्ये वर्णलेल्या व्यक्तिचा /वर्गांचा सम्पन्न वर्ग) शी संबंधीत नियमाचा उल्लेख असणे महत्वाचे आहे. त्याचबरोबर अनुलग्नक -5 मध्ये दिल्याप्रमाणे संपन्न वर्गासंबंधीचे उम्मेदवार स्वत : चे घोषणापत्र लावणेही जरुरी आहे. जो उम्मेदवार स्वत : च्या जातीबदद्ल चे अर्जात उल्लेखित प्रमाणपत्र लावणार नाहीत ते परिक्षेला बसण्यासाठी अपात्र ठरविले जातील.

1.15 अपेक्षित शैक्षणिक योग्यता/टेकनिकल योग्यता असणा-या अ.जा./अ.ज.जा./इमाव उम्मेदवार आरक्षित जागांसाठी अर्ज करु शकतात. परंतु त्यांना अनारक्षित उम्मेदवारांसाठी घेण्यात येणा-या परिक्षेला बसावे लागेल. अनारक्षित जागांसाठी अर्ज करणा-या अ.जा./अ.ज.जा./इमाव उम्मेदवारांना वयासाठी कुठलीही सुट देण्यात येणार नाही.

1.16 अ.जा./अ.ज.जा. समुदायातील उम्मेदवारांनां लेखी परिक्षेसाठी तथा पडताळणीसाठी बोलावले जाताना रेल्वे यात्रेसाठी दुस-या दर्जाचा मोफत पास देण्यात येईल. पण त्या साठी उम्मेदवारांने योग्य जातीचा दाखला प्रस्तुत केला पाहिजे.

1.17 शेवटच्या टप्प्यात नोकरी मिळणा-या पुरुष उम्मेदवारांनां रेल्वे इंजिनियर भागातील प्रांतिय सेंनेत काम करावे लागेल.

1.18 महिला उम्मेदवार अर्ज करण्यास पात्र आहेत. पण कठिण परिस्थितीत तथा विविध वेळे व्यतिरिक्त गरज/आवश्यकता पडल्यास कार्यालयात काम करणे त्यांच्यावर

बंधनकारक राहील. त्याचबरोबर मुख्यालय पासुन दुर अंतरावर असलेल्या कार्यालयात सुध्दा आवश्यकता असल्यास काम करावे लागेल.

1.19 रोजगार सुचनेतील अटी तथा नियमांमध्ये नियमानुंसार केलेले कोणतेही बदल अमलात आणले जातील. भविष्यात या रोजगार सुचनेत भर्ती संबंधीचे नियम किंवा अटी मध्ये बदल /सुधार /जोड देण्याचे अधिकार रेल्वे भर्ती बोर्डीलाच आहेत.

2. वय मर्यादा : कमी किवां अधिक वयोमर्यादा 01.07.2010 च्या अनुसार असावी. अधिक वयोमर्यादा सूट आवश्यक प्रमाणपत्र जोडल्यास प्राप्त होईल.

2.01 एससी/एसटी साठी 05 वर्ष

2.02 इतर मागासवर्गिय 03 वर्ष

2.03 माजी सैनिकांसाठी 03 वर्ष अधिकतम वयोमर्यादा सवलत मिळवण्यासाठी त्यानी एटेसटेशन नंतर कमितकमी सहामहिने सेवाकार्य केलेले असावे. अप्रेंटिस समूहाच्या पदासाठी अर्ज करणारे उमेदवारासं (उदाहरणार्थ ट्रेफीक अप्रेंटिस आणि कमर्शियल अप्रेंटिस) वयोमर्यादा सर्वसवलति सहित 40 वर्ष.

2.04 जम्मु-कश्मिर चे रहीवासी असलेल्या उमेदवारांसाठी 5 वर्ष. (अधिवासकाळ 1.1.1980 ते 31.12.1989).

2.05 अपंग उमेदवारांसाठी 10 वर्ष.

2.06 सामान्य वर्गातील रेल्वे कर्मचारी जे वर्ग क आणि ड आणि कॅजूयल लेबर / सबस्टीटूट याच्यां साठी अधिकतम वयोमर्यादा 40 वर्ष, तसेच एससी / एसटी कर्मचारी साठी 45 वर्ष आणि इतर मागासवर्गिय कर्मचारी साठी 43 वर्ष असेल, त्याचां कमित-कमी 3 वर्षीय सेवा कार्य पुर्ण असावे (सलग किवां तुटक) कर्मचारी रेल्वे विभागाच्या रेल्वे कॅन्टीन किंवा इंन्स्टीट्यूट मधे कार्यरत असतील त्यासं त्याच्या वयोमर्यदित कार्य केलेल्या अवधी इतकी सूट मिळेल (जास्तीत जास्त पाच वर्ष).

2.07 विधवा, घटस्फोटित महिला व पतीपासून न्यायालयीन कार्यवाही करुन वेगळया झालेल्या महिलांसाठी ज्यानी पुनःविवाह केला नाही अशांसाठी वयोमर्यदित सूट पूढील प्रमाणे आहे. सामान्य - 35 वर्ष, इतर मागासवर्गीय - 38 वर्ष, एससी / एसटी 40 वर्ष.

2.08 अनःरक्षित पदासाठी अर्ज केलेल्या एससी / एसटी / इतर मागासवर्गिय उमेदवारासाठी वयोमर्यदित कुठल्याही प्रकारची सूट मिळणार नाहीं.

2.09 वेगवेगळया वयाच्या वर्गाच्या उमेदवारासाठी जन्मतारीख खाली दर्शविलेल्या तारखा मधील असावे.

| अनुक्रमांक | वय वर्ग | अधिक जन्म तारीख | | | सगळयांसाठी न्यूनतम जन्मतारीख | |
|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Age group | Upper date of birth | | | Lower dt. of birth for all | रीमार्कस |
| | | VR | OBC | SC/ST | | |
| 1. | 18 to 33 | 02/07/77 | 02/07/72 | 02/07/72 | 01/07/92 | माहितीपत्रक संदर्भ 2.03 to 2.08, दर्शवीलेली वयोमर्यादा मधील शिथीलता लागू |

3. Examination Fees - परीक्षा फी

3.01 अनुसूचित जाति / अनुसूचित जनजाति / माजी सैनिक / अपंग / महिला / अल्पसंख्यांक / इतर मागासवर्गीय उमेदवाराचे कौटुबिंक मासिक उत्पन 50,000/- पेक्ष कमी असल्यास परीक्षा फी माफ.

3.02 बिना आरक्षित पुरुष / इतर मागासवर्गीय पुरुष उमेदवारांसाठी परीक्षा फी प्रत्येक अर्जासाठी 60 रु. राहील. उमेदवाराने परीक्षेत 1.05 मध्ये दर्शीवल्याप्रमाणे प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र पदासाठी स्वतंत्र अर्ज व IPO / DD परीक्षा फी म्हणून पाठवावी.

3.03 परीक्षा फी (विना परतावा) परत केली जाणार नाही. IPO / DD ची वैद्वता सहा महिने पर्यतची असावी व ते राष्ट्रीयकृत बँकेच्या मुख्य शाखेत देय असावे किंवा भारतीय टपाल आदेशाच्या स्वरुपात सहायक सचिव किंवा सदस्य सचिव किंवा अध्यक्ष संबंधित रेल्वे भर्ति मंडल यांच्या नावे असावा। (परिच्छेद 15 मध्ये दिल्या प्रमाणे). IPO / DD हे संबंधित रेल्वे भर्ति मंडल ज्या ठिकाणी असेल तिथे देय असावे. IPO आणि DD हे रोजगार सूचना प्रसिद्व झाल्याच्या अगोदरचे किंवा अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेचे च्या नंतरचे नसावे.

3.04 उमेदवाराने रोजगार सूचना नंबर, अर्ज केलेल्या पदाच / पदाची नावे, पदसंख्या आणि स्वतःचे नाव व पत्ता DD च्या पाठच्या बाजूस व IPO च्या पुढील बाजूस दिलेल्या मोकळया जागेत लिहावे.

3.05 परिक्षा फी DD/IPO च्या व्यतिरिक्त अन्य कुठल्याही स्वरुपात स्विकारले जाणार नहीं.

3.06 परिक्षा फी DD आणि IPO संबंधित सर्व माहिती अर्जात दिलेल्या संबंधित जागेवर भरावी. (माहिती पत्रक संदर्भ 5).

3.07 IPO / DD परीक्षा फी च्या स्वरुपात आवश्यक असल्यास अर्जासोबत न जोडल्यास अर्ज रद्द केला जाईल.

3.08 अल्पसंख्याकं म्हणजे मुस्लिम, ख्रि-चन, सिख, बुद्व आणि पारशी उमेदवारानी परीक्षा फी माफी मिळविण्यासाठी अर्जासोबत संदर्भ 8 मधे दिल्या प्रमाणे स्वघोषित घोषणा पत्र अर्जासोबत जोडावे. प्रमाण पत्र पडताळणीच्या वेळेस ज्या उमेदवारानीं अल्पसंख्यांक फी माफी चे उपभोग घेतला असल्यास उमेदवारानी अल्पसंख्यांक समाज घोषणा पत्रक नॉन ज्यूडीशीयल स्टॅम्प पेपरवर शपथपत्र (Affidivate) सादर करावे अन्यथा त्यांची उमेदवारी रदद केली जाईल.

3.09 आर्थिक दृष्ट्या मागासवर्गिय उमेदवार म्हणचे ज्याचे वार्षिक कौटुबिंक उत्पन्न 50,000/- रुपया पेक्षा कमी असल्यास त्यानी परीच्छेद 7 मधे दर्शविल्यिा नुसार उत्पनाचा दाखला संबंधित अधिका-याच्या लेटर हेड वर घेवून अर्जासोबत जोडावा.

4. अर्ज कसा करणे :-

4.01 अर्जाचा अनु क्र. 1 आणि 2 उमेदवारांनी आपल्या सवतःच्या हस्ताक्षरात नमूना निळया किंवा काळया बॉलपेनने (पेन्सील, फाऊंटन पेन व जेल पेन स्विकारण्यात येणार नाहीं) सही आणि तारखे सहीत भरावे. फक्त अंतरराष्ट्रीय अंकाचा 1, 2, 3 ... इंग्रजी वापर करावा. अर्ज फक्त इंग्रजी आणि हिंदी भाषेत भरावा, या जाहीरातीत दिलेल्या सर्व नियमांचे काटेकोरपणाने पालन करावे. अर्जदाराने आपल्या अर्जावर स्वतःची सही इंग्रजी आणि हिंदी मध्ये करावी. इंग्रजी मधील मोठया लिपीतील सही व तुटकतुटक सही अर्जावर स्वीकारण्यात येणार नाहीं.

4.02 अर्जदार जरी आपला अर्ज हिंदी मध्ये भरत असला तरी त्याने आपले नाव, पत्ता (पिनकोड सहीत), जन्म तारीख, वडीलांचे नाव आणि जवळपासचे रेल्वे स्टेशन हे इंग्रजीमधील मोठया लिपीतच भरावे.

4.03 अर्जा मधे दिलेल्या फोटोच्या जागे मध्ये अर्जदाराने अलीकडच्या काळातला टोपी व गॉगल-शिवाय समोरुन काढलेला रंगीत पासपोर्ट साईज फोटो चिटकंवणे. फोटोची फोटोप्रत स्विकारण्यात येणार नाहीं. अर्जदाराने फोटोच्या खाली दिलेल्या रकान्यात सही करावी. अर्जदाराने लक्षात ठेवणे जरुरीचं आहे की अर्जावर लावलेला फोटो जास्त जुना किंवा अस्पष्ट असल्यास किंवा अर्जदार व अर्जावर लावलेल्या फोटोमध्ये काही फरक आढळल्यास कुठल्याही-क्षणी अर्ज रद्द करण्यात येईल.

4.04 अर्जामध्ये नमूद केलेल्या क्रमांक 9 मध्ये अर्जदाराने स्वतःच्या शरीरावरील स्पष्ट दिसणारे खूण (उदा. नाकावरील एखादा तिळ, कपाळावरील एखादी खूण, डोक्याच्या डाव्याबाजूला एखादी खूण, डाव्या हाताच्याखाली एखादी खूण) अर्जदाराने अर्जा मध्ये

नमूद केलेल्या रकान्यामध्ये आपल्या शरीरावरील खूणा लिहील्या नाहीत तर तो अर्ज रद्द केला जाईल.

4.05 अर्जा मध्ये नमूद केलेल्या क्रमांक 13 मध्ये दिलेला इंग्रजी आणि हिंदी परिच्छेद अर्जदाराने जसाच्या तसा स्वतःच्या धावत्या अक्षरात (मोठया लिपीत नाही व शब्दामध्ये अंतर न ठेवता) लिहावा. नाहीतर अर्ज रदद करण्यात येईल.

4.06 अर्जदाराने आपल्या डाव्या हाताच्या अंगठयाचे ठसा अर्जामध्ये नमूद केलेल्या रकान्यामध्ये लावावे. अर्जदाराच्या अंगठयाचा ठसा स्पष्ट आणि पूर्ण असणे व अंगठयावरील प्रत्येक शिरा किंवा लाईन ठशामध्ये स्पष्ट असणे आवश्यक आहे.

4.07 अर्जदाराचा अर्ज सर्व बाबींनी परिपूर्ण, अपूर्ण, सही शिवाय, मोठया लिपीतील सही, नमुन्यानुसार नसतील, अर्जदाराच्या फोटो शिवाय, आई.पी.ओ. / डिमाण्ड ड्राफट शिवाय, आणि रोजगार सुचना जारी करण्याच्या आधी आणि शेवटच्या तारखेनंतरचे भा.पो.आ. / डिमाण्ड ड्राफट लावलेले अर्ज रद्द करण्यात येतील.

4.08 अर्जदाराच्या लिफाफयावर स्पष्ट अक्षरात खालील गोष्ठी नमूद करणे :-

------- पदासाठी अर्ज, कोटी क्र. ------, रोजगार अधीसूचना ------- जाती (अ.जा / अ.ज.जा / अ.पि.व / शरीरीक अपंग / भूतपूर्व सैनिक) ज्या अर्जावर पदाचे नाव, कोटी संख्या नमूद केलेल्या नसतील तर असे अर्ज मान्य केले जाणार नाहीत.

5. संलग्न :- प्रत्येक उमेदवाराला खाली दर्शविलेले संलग्नक अर्जाबरोबर जोडणे बंधनकारक आहे :-

5.01 विहीत नमुन्यामधे अर्ज करणे (उदा. परीषीष्ठ क्रं 1)

5.02 विहीत नमुन्यामधे माहिती पत्र (उदा : परिषीष्ठ क्र. 2 मध्ये दर्शविल्याप्रमाणे)

5.03 विहीत पोस्टल ऑडर / डि डी रोजगार सुचना मध्ये दर्शविलेल्या योग्य त्या मुल्याचा (सामान्य आणि इतर मागास वर्गीय उमेदवारा साठी).

5.04 पारपत्र आकाराचा ओळखण्यायोग्य रंगीत फोटो (अर्जा वर चिकटवलेल्या फोटो व्यतिरिक्त आणखी एक अधिक).

5.05 दहावी / बारावी चे उत्तीर्ण परीक्षेचे स्वः प्रमाणित प्रमाण पत्र ज्यामधे ज्न्मतारीख दर्शविलेली असेल.

5.06 अर्ज केलेल्या पदासाठीची शैक्षणिक पात्रता : कामाच्या अनुभवाची स्वप्रमाणित प्रमाण पत्राच्या प्रति.

5.07 सक्षम अधिकारी द्वारा दिला गेलेला जातीचा दाखला एससी / एसटी उमेदवारांसाठी (परिषीष्ठ क्र. 3 मधे दर्शविल्या प्रमाणे) आणि इतर मागासवर्गीय उमेदवारासाठी

(परिशिष्ठ क्र. 4 मधे दर्शविल्या प्रमाणे) तसेच इतर मागास वर्गीय उमेदवारांनी नॉन क्रीमीलीयर चे स्वंय घोषीत प्रमाण पत्र (परिशिष्ठ क्र. 5 मधे दर्शविल्या प्रमाणे).

5.08 शारीरिक दृष्टया अपंग उमेदवाराना विहीत नमुन्यात दर्शविल्या प्रमाणे अपंगत्वाचे प्रमाण पत्र (परिषीष्ठ क्र. 9 मधे दर्शविल्या प्रमाणे).

5.09 दृष्टि अपंगत्व उमेदवारने स्वप्रमाणित घोषणा पत्र व परीक्षा लिहीण्या साठी लागणारा सहाय्यक लिपीक (परिषीष्ठ 10 मधे दर्शवील्या प्रमाणे).

5.10 माजी सैनिकानी, निवृत्ती प्रमाण पत्राची झेरॉक्स प्रत तसेच स्वयघोषित सक्षम अधिका-या द्वारे दिले गेलेले शैक्षणीक / तांत्रिक पात्रतेचे प्रमाण पत्र.

5.11 जर उम्मीदवार रेल्वे मधे किवां सरकारी विभागात / सार्वजनिक क्षेत्रात कार्यरत असल्यास सक्षम अधिका-याचे ना हरकत प्रमाण पत्र.

5.12 ज्या उमेदवाराना इतर कोणत्याप्रकारे वयात शिथीलता हवी असल्यास त्या प्रकारच्या विनंती प्रमाण पत्राची स्वयंघोषित झेरॉक्स प्रत.

5.13 आर्थिक दृष्ट्या मागास वर्गीय उमेदवारांस परीक्षा फी माफी हवी असल्यास विहीत नमुन्यामधे उत्पनाचा दाखला परीशिष्ठ क्र. 7 मधे दर्शविल्या प्रमाणे जोडावे.

5.14 अल्पसंख्याक उमेदवाराना फी माफी हवी असल्यास "अल्पसंख्याक स्वंयघोषित प्रमाण पत्र " (परिशिष्ठ क्र. 8 मधे दर्शवील्या प्रमाणे).

6. बाद अर्ज -

अर्जदाराना विनंती करण्यात येते की त्यानी रेल्वे भर्ति बोर्डाकडे अर्ज पाठविण्यापूर्वी सर्व अटी, नियम आणि इतर सुचनांचे सखोल वाचन करावे अन्यथा त्याचें अर्ज बाद ठरविण्यात येतील. बाद करण्यात आलेल्या अर्जा संबधीची माहीती अर्जदाराना पोस्टाने कळविण्यात येईल.

6.01 रोजगार सूचनेच्या शेवटच्या तारखेनंतर मिळालेले अर्ज.

6.02 अर्जातील माहीती पत्रकातील पॅरेग्राफ लिहीला नसेल किंवा इग्रंजीच्या कॅपीटल मधे लिहीला असल्यास.

6.03 अर्ज विना स्वाक्षरी असेल किंवा स्वाक्षरी इग्रंजीच्या कॅपीटल मधे असेल.

6.04 डाव्या हाताच्या अंगठयाचा ठसा नसेल किंवा स्पष्ट नसल्यास आवश्यक कागदपत्रे न जोडल्यास.

6.05 1) जन्मतारखे संबधी जन्मतारीख दाखला किंवा दहावी उत्तीर्ण प्रमाण पत्र.

2) शैक्षणिक पात्रते संबधी प्रमाण पत्र.

3) जाति प्रमाण पत्र (अजा / अजजा / इमाव)

4) माजी सैनीकांसाठी सेवानिवृत्त प्रमाण पत्र.

5) अपंग प्रमाण पत्र : अपंग उमेदवारासाठी.

6) उत्पनाचा दाखला : परीक्षा फी माफी साठी अर्ज करणा-या आर्थिक दृष्या कमकुवत वर्गासाठी.

7) अल्पसंख्याकासाठी स्वतःचे निवेदन, जर फि माफी साठी अर्ज केला असल्यास.

6.06 मागास वर्गीयांसाठीचे प्रमाण पत्र विहीत नमुन्यात नसल्यास.

6.07 लोकोपायलट / सहाय्यक स्टेशन मास्टर / मोटरमन पदासाठी आवश्यक असलेले विजन सर्टिफीकेट नसल्यास.

6.08 आवश्यक परीक्षा फी नसल्यास / कमी असल्यास किंवा IPO / DD शेवटच्या तारखेनंतर खरेदी केलेले असल्यास.

6.09 ओळख चिन्हांचा उल्लेख अर्जात नसल्यास.

6.10 अर्ज करते वेळी आवश्यक शैक्षणिक पात्रता नसेल तर.

6.11 वयाने लहान किंवा मोठा असेल किंवा खोटी जन्मतारीख लिहील्यास.

6.12 एकाच पदासाठी एक पेक्षा जास्त अर्ज केल्यास.

6.13 अर्ज विना फोटो असेल किंवा टोपीघालून फोटो काढला असेल किंवा ओळखण्या योग्य नसेल किंवा स्कॅन केलेला असेल.

6.14 एकाच लखोटयात एकापेक्षा जास्त अर्ज असल्यास.

6.15 रेल्वे बोर्डाच्या (डिबार) बंदि घातलेल्या उमेदवारांच्या यादीत नाव असल्यास.

6.16 अपूर्ण किंवा अस्पष्ट अर्ज.

6.17 विहीत नमुन्यात नसलेला अर्ज.

6.18 पद क्रमांक किवां पदाचे नाव नसेल किंवा चुकीचे असल्यास.

6.19 इतर बोर्डासाठी अर्ज केलेला असल्यास.

6.20 हिंदी / इंग्रजी व्यतिरिक्त भाषेत अर्ज असल्यास.

6.21 रोजगार सूचना प्रकाशित होण्याआधी अर्ज केल्यास.

6.22 इतर काही चुका ज्याच्या ने अर्ज बाद होऊ शकतो.

7. भर्तीची प्रकिया :

7.01 अर्जदाराची निवड फक्त एक स्तर किंवा दोन स्तरांच्या परीक्षा च्या मेरीट नुसार होते, त्या व्यतिरिक्त अकांउट सहाय्यक पदासाठी योग्यता परीक्षा घेतली जाईल, आवश्यकतेनुसार व मेरीट योग्यतेनुसार अर्जदाराला प्रमाण पत्राच्या पडताळणीसाठी बोलावले जाईल.

7.02 लिखीत परीक्षेमधे निगेटीव मार्कींग असेल. प्रत्येक चूकीच्या उत्तराला 1/3 प्रमाणे गुण वजा केले जातील.

7.03 लेखी परीक्षेसाठी अभ्यासक्रम हा शैक्षणिक अहर्तेवर अवलंबून असतो. प्रश्न पत्रिका बहुपर्यायी असेल व त्यात सामाजिक ज्ञान, अंकगणित, बौधिक क्षमता, भाषा - हिंदी इंग्रजी संबंधी प्रश्न असतील. प्रश्नपत्रिका हिंदी, इंग्रजी व उर्दु सहित मराठी भाषेत ही असेल, परिक्षेचा अवधी 90 मिनीटांचा असेल व त्यात अंदाजे 100 ते 120 प्रश्न असतील.

7.04 रेलवे भर्ती बोर्ड आपल्या अधिकारक्षेत्रात कोणत्याही पदासाठी आवश्यकता भासल्यास अधिक लेखी परीक्षा किंवा पात्रता परीक्षा घेवू शकतो.

7.05 परीक्षेची वेळ, तारीख, ठिकाण हया संबधीची माहिती अर्जदाराना ठराविक कालावधीत पाठविली जाईल. कोणत्याही परीस्थितीत परीक्षेची तारीख, वेळ, ठिकाण हयात बदल केला जाणार नाहीं.

7.06 पदासाठी आवश्यक परीक्षास्तर त्या पदाच्या समोर देण्यात आली आहे. लेखी परीक्षेच्या आधारावर रिक्त जागा एवढयाच अर्जदाराना प्रमाण पत्र पडताळण्यासाठी बोलावले जाईल. रिक्त जागांच्या 30% अधिक अर्जदाराना लेखी परीक्षेच्या आधारावर प्रमाण पत्र पडताळणी साठी बोलावले जाईल परंतु त्याची नियुक्ति जर मुख्य यादित कमतरता पडल्यावरच होईल. प्रमाण पत्र पडताळणीसाठी येताना सर्व अर्जदारानी आवश्यक ती प्रमाण पत्रे आणने आवश्यक आहे, त्यासाठी वाढीव वेळ दिला जाणार नाहीं आणि त्यांची उमेदवारी रद्द समजली जाईल.

7.07 प्रत्येक अर्जदाराची अंतिम निवड ही त्याच्या संबधित रेल्वे ने घेतलेल्या वैद्यकिय चाचणी प्रमाण पत्राच्या पडताळणी व खातरजमा तसेच चरीत्र प्रमाण पत्र पडताळणीवर अवलंबून असेल.

8. **वैदयकीय योग्यता चाचणी** :

नियुक्तिसाठी अनुमोदीत केलेल्या अर्जदारांना संबंधीत रेल्वे कडुन घेण्यात येण्यात वैद्यकीय योग्यता चाचणी पास करावी लागेल. जी संबंधीत पदाच्या आवश्यकतेनुसार असेल. वैद्यकीय तपासणीत डोळयाची योग्यता मुख्य असेल. पदांच्या आवश्यकतेनुसार वैद्यकीय तपासणीचे खालील प्रकार असतात.

क. ए-1 शारीरिक रुपाने सुदृढ/दृष्टी मापन 6/6, 6/6 बिना चष्माशिवाय जवळची दृष्टी एस.एन. 0.6,0.6 बिना चष्माशिवाय (दव बिंदु टेस्ट करुन)वर्ण दृष्टी, बायनाक्युलर दृष्टी, दृष्टी क्षेत्र तथा रात्री दृष्टी परिक्षा अवश्य उत्तीर्ण करावी.

ख. ए-2 शारीरिक रुपाने सुदृढ/दृष्टी मापन दुर दृष्टी 6/9,6/9 चष्माशिवाय जवळची दृष्टी एस.एन.
0.6,0.6 बिना चष्माशिवाय वर्ण दृष्टी, बायनाक्युलर दृष्टी, दृष्टी क्षेत्र तथा रात्री दृष्टी परिक्षा अवश्य उत्तीर्ण करावी.

ग. ए-3 शारीरिक रुपाने सुदृढ/दृष्टी मापन दुर दृष्टी 6/9,6/9 चष्माशिवाय जवळची दृष्टी एस.एन.
0.6,0.6 चष्मा किंवा चष्माशिवाय (लेंस ची पावर 2 डी पेक्षा जास्त नको)जवळची दृष्टी एस.एन. 0.6,0.6 चष्मा किंवा बिना चष्माशिवाय वर्ण दृष्टी, बायनाक्युलर दृष्टी, दृष्टी क्षेत्र तथा रात्री दृष्टी परिक्षा अवश्य उत्तीर्ण करावी.

घ. बी-1 शारीरिक रुपाने सुदृढ/दृष्टी मापन दूर दृष्टी 6/9,6/12 चष्मा किंवा बिना चष्म्याचा (पॉवर 4 डी पेक्षा जास्त नको) जवळची दृष्टी एस.एन. 0.6,0.6 चष्मा किंवा बिना चष्म्याचा - वाचतांना किंवा बारीक काम करताना, वर्ण दृष्टी, बायनाक्युलर दृष्टी, दृष्टी क्षेत्र तथा रात्री दृष्टी परिक्षा अवश्य उत्तीर्ण करावी.

ङ बी-2 शारीरिक रुपाने सुदृढ/दृष्टी मापन दूर दृष्टी 6/9,6/12 चष्मा किंवा बिना चष्म्याचा (पॉवर 4 डी पेक्षा जास्त नको) जवळची दृष्टी एस.एन. 0.6,0.6 चष्मा किंवा बिना चष्म्याचा - वाचतांना किंवा बारीक काम करताना, दृष्टी क्षेत्र परिक्षा अवश्य उत्तीर्ण करावी.

च. सी.1 शारीरिक रुपाने सुदृढ/दृष्टी मापन दूर दृष्टी 6/12,6/18 चष्मा किंवा बिना चष्म्याचा जवळची दृष्टी एस.एन. 0.6,0.6 चष्मा किंवा बिना चष्म्याचा - वाचतांना किंवा बारीक काम करताना, दृष्टी क्षेत्र परिक्षा अवश्य उत्तीर्ण करावी.
छ. सी.2 शारीरिक रुपाने सुदृढ/दृष्टी मापन दूर दृष्टी 6/12,निळा चष्मा किंवा बिना चष्म्याचा जवळची दृष्टी एस.एन. 0.6 संयुंक्त चष्मा किंवा बिना चष्म्याचा - वाचतांना किंवा बारीक काम करताना, टिपणी :
क. वरिल दृष्टी मापन (नियम) सांकेतिक आहेत तथा सर्व अंगसंपूर्ण नाही आणि सामान्य पणे उम्मेदवारांना लागु होतात.
ख. भुत पूर्व सैनिकांसाठी वेगळे निकष लागु होतात.
9. भूतपूर्व सैनिक अर्जदार

या रोजगार सूचनामध्ये भूतपूर्व सैनिकांसाठी काही निरपेक्ष पदे आरक्षीत ठेवलेल्या आहेत. तथापि भूतपूर्व सैनिक इतर अन्य पदांसाठी जे त्याच्यासाठी लागू नाहीयेत, त्यासाठी देखील अर्ज करु शकतात ज्यासाठी त्यांना परिच्छेद 2.03, आणि 3.01 मध्ये उल्लेखलेल्या क्रमशः वय सीमा अथवा परीक्षा फी कमी केली जाईल.

9.01 भूतपूर्व सैनिक शब्दाचा अर्थ त्या व्यक्तीसाठी आहे की जो भारतीय संघाच्या नियमित सेना, नौ सेना, वायु सेवा मध्ये कुण्ठल्याही रॅन्कमध्ये सेवा केली असेल, (किंवा - कंबोटंन्ट आणि नॉन कंबोटंन्ट) परंतु या पदांसाठी त्या व्यक्ती समाविष्ट नाहीयेत ज्या व्यक्तींनी रक्षा सुरक्षा कोर, जनरल रिझर्व इंजिनियरी फोर्स, लोक सहाय्यक सेना, आणि अर्ध सैनिक बल सेवा आणि.

9.02 ज्या अशा व्यक्ति ज्यांनी आपली पेन्शन घेतल्यानंतर सेवानिवृत्त झाले आहेत. किंवा

9.03 ज्या व्यक्ती मिलीटरी सैन्यातील सेवेसाठी लागू आहेत व जे वैद्यकिय चाचणी मध्ये अयोग्य असल्यामुळे त्यांना सेवेतून मुक्त केले आहे अशा कर्मचा-यांना पेन्शन दिली गेली आहे किंवा.

9.04 ज्या सेवा कर्मचा-यांच्या संख्या कमी केल्या कारणाने अशा सेवेसाठी त्यांना स्वतःच्या विनंतीवरुन कार्यमुक्त करण्यात आले आहे, किंवा

9.05 स्वतःच्या विनंती केल्यामुळे अथवा वाईट वर्तणुक अथवा अप्रवीणतेमुळे कार्यातून कार्यमुक्त केले गेले आहे आणि ज्यांनी कार्याचा अवधि पूर्ण केला असून त्यांना सेवामुक्त केले आहे आणि ज्यांना प्रादेशिक सेनेत खालील पदांच्या कामासाठी घेतले गेलेले आहे.

अ) सततच्या कार्यासाठीचे पेंशनधारी आणि

ब) मिलीटरी सेवेच्या नियामाप्रमाणे अशक्तता पेंशन-भोगी आणि

क) वीरता पुरस्कार विजेते

9.06 दहावी पास भूतपूर्व सैनिक ज्यांनी सक्षस्त्र बळांत 15 वर्षा पेक्षा जास्त सक्रीय काम केले, भूतपूर्व सैनिकासाठी आरक्षित पदे ज्या साठी कमीत कमी शैक्षणिक योग्यता विश्व विद्यालयाची डीग्री आहे असे उमेदवार अर्ज करण्यास पात्र आहेत. पण या साठी मिलीटरी अधिका-याचे प्रमाण-पत्र लावणे गरजेचे आहे.

व्याख्या : संघातील सशस्त्र दलातील कार्यरत व्यक्ति जे निवृत्तिनंतर भूतपूर्व सैनिका मध्ये येतात, निर्धारित कार्यकाल पूर्ण होण्याआधी एक वर्षात अर्ज भरु शकतात तथा ते भूतपूर्व सैनिकासाठी असलेले फायदे घेऊ शकतात पण त्यांना निर्धारित कार्यकाल पूर्ण

होण्याआधी सेवामुक्त करण्याची परवानगी दिली जाणार नहीं. ज्या भूतपूर्व सैनिकांना केन्द्र सरकारने आधीच ग्रुप ग/घ मधे नौकरी दिली आहे तथा त्या नोकरीसाठी त्यांना वयाची सवलत दिली आहे अशा भूतपूर्व सैनिकांना पुन्हा आरक्षणाचा लाभ देता येणार नाहीं.

9.07 भूतपूर्व सैनिकांनी अर्जात आपल्या समुदायाबददल तथा अन्य माहीतीबददल स्पष्ट माहिति दिली पाहिजे त्याचबरोबर यासंदर्भातील प्रमाणपत्रे देणे गरजेचे आहे.

10. विकलांग / अर्जदार

10.01 अपंग व्यक्तीसाठी पदाच्या उपयुक्ततेचा उल्लेख प्रत्येक पदाच्या समोर केला गेला आहे. काही पदांच्या संबंधात निश्चित असे रकाने अपंग अर्जदारासाठी सुरक्षित आहेत, याव्यतिरिक्त त्या पदांसाठी सामान्य अर्जदार आपल्या संबंधित जैसे :- अजा / अजा / अजजा / अपिव मध्ये पण अर्ज करु शकतात. जे अपंग अर्जदार म्हणून मान्य केले गेले असतील किंवा भले ही त्यांच्यासाठी वेगळे रकाने निश्चित केले गेले नसतील.

10.02 (1) कोणत्याही पदासाठी अपंग व्यक्तीसाठी आरक्षण असो वा नसो त्यांना परिक्षा शुल्क देय नाहीं.

(2) कोणत्याही पदासाठी आरक्षण असो व नसो, जर ते पद अपंग व्यक्तींसाठी योग्य असेल तर अधिकतम वयात 10 वर्षांची सूट दिली जाईल. अधिकतर उमेदवार इ.मा.व. किंवा अनु.जा / अनु. जा. चा असेल तर त्यांना 3/5 वर्षांची सवलत असेल.

10.03 अपंगाची व्याख्या - अपंगांचे प्रकार खालील प्रमाणे असतील -

अ) अंध - खालील प्रकारची कोणतीही व्याधी असल्यास त्यांना अंध संबोधीत केले जाईल (i) दोन्ही डोळयांनी काहीच न दिसणे (ii) 6/60 किंवा 20/200 पर्यंत दृष्टी असणे (iii) 20 डिग्री पेक्षा कमी दृष्टी असणे.

ब) कमी दृष्टी :- एखादया व्यक्तिची दृष्टी कमी असणे म्हणजेच दृष्टी संबंधीत आवश्यक अशा साधनांचा उपयोग करुन एखादे काम आमलात आणणे.

क) बहिरे :- बहिरेपणा म्हणजेच सदय परीस्थीती 60 डेसीमल किंवा जास्त प्रमाणात ऐकू न येणे.

उ) हाडे, सांधे, किंवा स्नायु, मध्ये आवश्यकते पेक्षा कमी हालचाल असणे.

ई) मनोरुग्ण

फ) इतर

10.04 आरक्षणासाठी अपंगंत्वाचे प्रमाण :

आरक्षणासाठी अपगत्वाचे प्रमाण ज्या व्यक्तीचे संबधित अपंगत्वाचे 40% पेक्षा जास्त असल्यासच ते सेवेत / पदामधे आरक्षणासाठी पात्र असतील.

10.05 अपंगत्वाचे प्रमाण पत्र देण्यासाठीचे सक्षम अधिकारी - केंद्र किंवा राज्य सरकार ने नियुक्त केलेल्या वैद्यकिय कमिटीस डीसीबलेटी सर्टीफिकेट देण्याचे अधिकार असतील. कमीत-कमी (अपंग) तीन माणसांची वैद्यकिय कमिटी स्थापन करण्याचा अधिकार केंद्र किवा राज्य सरकारला आहे. कमिटी मधे कमीत कमी एक मेंबर ज्या त्या क्षेत्रातील निपुण विशारद असावा.

10.06 जर एखादया उमेदवाराला लेखनीक अथवा मदतनीसाची आवश्यकता असेल तर त्यानी संलग्नक क्रमांक 10 च्या नमुन्यानुसार अर्जासोबत कळविणे आवश्यक आहे. खालील शर्तीनुसार मदतनीस घेण्यास मान्यता दिली जाईल.

अ) उमेदवारानी मदतनीस /लेखनीकाची सोय स्वतःहा आणि स्वतःहाच्या मोबदल्यात करावी. मदतनीसासाठी वेगळे प्रवेश पत्र दिले जाईल. मदतनीसाच्या अर्जात त्याची स्वतःहाची सही असलेला फोटो असणे आवश्यक आहे.

ब) मदतनीसाची शैक्षणिक अर्हता अर्जदाराने ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पेक्षा कमी असावी.

क) मदतनीस उमेदवाराच्या शैक्षणिक अर्हते पेक्षा वेगळया शैक्षणिक अर्हतेचा असू शकतो. मदतनीसानी त्याच्या शिक्षणात 60% पेक्षा जास्त गुण अर्जीत केलेले नसावें.

ड) उमेदवार किंवा मदतनीस यांनी सलग्न दहा प्रमाणे नमुद करावे की, वर नमुद केल्या प्रमाणे आवश्यक अटी मदतनीस पूर्ण करतो. भविष्यात जर असे आठळले की उमेदवारानी अर्धवट किंवा असत्य माहीती पुरवली तर त्याची उमेदवारी कोणतीही सबब न देता रद्द केली जाईल. मदतनीसानी केलेल्या कोणत्याही गैरवर्तनाची जवाबदारी दृष्टीहीन उमेदवाराची असेल. ज्या दृष्टीहीन उदमेदवाराची लिखाण क्षमता कमी असेल त्यानीच सलग्न दहा म्रमाणे प्रतिज्ञा पत्र दयावे.

10.07 सर्व एक नेत्र असलेले उमेदवार आणि दृष्टी अपंगत्व असलेले उमेदवार हयांची दृष्टीहीनता 40% पेक्षा कमी असल्यास त्याना व्हिज्युअली अपंग उमेदवारास गणले जाणार नाही तसेच त्याना लेखी परीक्षेच्या वेळेस सहाय्यक लेखनिक (scribe) दिला जाणार नाहीं.

10.08 निवड झालेल्या सर्व उमेदवाराना त्याच्यां नेमणुकीच्या वेळेला रेल्वे मेडीकल ॲथारिटी द्वारा निर्धारित केलेल्या वैद्यकिय मानकानुसार वैद्यकिय परीक्षा पास केलेले उमेदवार

नेमणुकीसाठी पात्र असतील. अपात्र उमेदवार रेल्वेत नेमणुकीस योग्य घोषित केले जाणार नाहीत.

11. कार्यरत कर्मचारी : जे उमेदवार कुठल्याही सरकारी विभागात किंवा पब्लिक सेक्टर अंडरटेकींग बाय गव्हरमेंट रेल्वे सहित त्यानी त्याच्यां कार्यालयातील विभागाकडून अग्रेषीत करुन किंवा सरळ रेल्वे भर्ती बोर्ड कडे ना हरकत प्रमाण पत्रा सोबत अर्ज करावा. अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या तारखे अगोदर नाहरकत प्रमाण पत्र सहित रेल्वे भर्ती बोर्डा कडे न पोहचल्यास त्याचें संबंधित कार्यालय जवाबदार राहील. ना हरकत दाखल्या शिवाय केलेले अर्जाची अगोदरची प्रत ग्राहय धरली जाणार नाही. अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारखेनंतर व वेळेनंतर येणारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीं.

12. ऑन लाइन रजीस्ट्रेशन : उमेदवाराना त्यांचे अर्ज ऑनलाईन भरण्याचा पर्याय उपलब्ध आहे. ऑनलाईन रजीस्ट्रेशन साठी उमेदवारानी संबधित **RRB** च्या वेबसाईटवर जाऊन त्यांची संपूर्ण माहिती अर्जाच्या फॉरम्याट मधे व माहिती पत्रकामधे भरावी, जे फारम्याट वेबसाईटवर उपलब्ध आहेत. सध्या अर्ज ऑनलाइन रजीस्ट्रेशन करण्याची सुविधा बेंगलोर, चेन्नई, मुंबई, पटना, रांची, तीरुअनंतपुरम हया भर्ती बोर्डा कडे उपलब्ध आहे. उमेदवारानी भरलेल्या अर्जाची प्रत व माहीती पत्रक घेऊन त्याच्यावर पारपत्रसाइज रंगीत फोटो त्यांची स्वाक्षरी डाव्या हाताचा अंगठयाचा ठसा अर्जात दिलेल्या योग्य त्या जागेवर दयावा. माहिती पत्रका मधे संदर्भ क्र. 13 मधे दिलेला परिच्छेद कॉपी करुन परीक्षा फी सहित (लागू असल्यास) संबधित रेल्वे भर्ती बोर्ड मंडळाकडे पाठवावा. जन्म तारीख प्रमाण पत्र, शैक्षणिक व नोकरीची पात्रता प्रमाण पत्र, एस सी / एसटी / ओबीसी प्रमाण पत्र, परिशिष्ठ 5 मधे दर्शविल्या प्रमाणे ओबीसी उमेदवारांसाठी घोषणा पत्र, माजी सैनीकांचे डीसचार्ज प्रमाण पत्र, अपंग उमेदवाराचे प्रमाण पत्र, अपंगत्वाचे प्रमाण पत्र, अल्पसंख्यांक उमेदवारांचे स्वयंघोषित अल्पसंख्यांक प्रमाण पत्र, आर्थिक दृष्ट्या मागासवर्गीय उमेदवारांचे प्रमाण पत्र या सर्व प्रमाण पत्रा सहित ऑनलाईन अर्ज संबंधित रेलवे भर्ती बोर्डा कडे अंतिम तारखेच्या अगोदर न पोहचल्यास ऑनलाइन रजिस्ट्रेशन अपात्र समजले जावें.

13. अन्य

13.01 अनुलग्नसहीत संपूर्ण रोजगार सूचना रे.भे.बो-च्या वेबसाइटवर उपलब्ध आहे. उमेदवार अनुलग्नसहित अर्जाची तथा सूचनेची प्रत छापून घेऊ शकता तथा त्याचा उपयोग अर्ज करण्यासाठी करु शकता.

13.02 सर्व अनुलग्नक हिंदी किंवा इंग्रजी भाषेत हवेत. जिथे प्रमाण पत्र हिंदी / इंग्रजीत नाही, तिथे त्यांची अनुवादित प्रत लावणे गरजेचे आहे. गरज असलेल्या प्रमाण पत्राची प्रत न लावल्यास अर्ज रद्द केला जाईल. वेगळा अनुलग्नक पाठविला गेला तर त्याची दखल घेतली जाणार नाहीं.

13.03 रे.भ.बो. लेखी परीक्षा देशात कुठेही करु शकतो. रे.भ.बो. द्वारा निर्धारित केलेली परिक्षाकेंद्र अंतिम राहतील.

13.04 रे.भ.बो. ज्यादा लेखी परीक्षा / टाइपिंग परीक्षा / मुलाखत / पडताळणी कुठल्याही क्षणी करण्याचे अधिकार राखून ठेवत आहें. त्याच प्रमाणे या सूचनेत दर्शविलेल्या जागासाठी अंशतः तथा संपूर्ण भर्ती प्रक्रिया कुठल्याही क्षणी कुठलेही कारण न देता रद्द बातल ठरवू शकतो.

13.05 योग्यता, अर्ज स्वीकारणे किंवा अस्वीकार करणे, मोफत रेलवे पास देणे, खोटया सूचनाकरिता शिक्षा करणे, निवडप्रक्रिया, लेखी परिक्षा तथा मुलाखतीचे आयोजन, दक्षता / अभिरुची परीक्षाा केंद्राचे वाटप, निवड, निवडक उमेदवारांचे जागासाठी वाटप इ. सर्व बाबीं साठी रे.भ.बो. चा निर्णय अंतिम आणि उमेदवारांना बाध्य असेल. या संदर्भात कुठल्याही चौकश्या किंवा पत्रव्यवहाराची दखल रे.भ.बो. घेणार नाहीं.

13.06 अंतिम स्वरुपात निवड झालेल्या उमेदवाराना जरुर पडल्यास भारतीय रेल्वेत कुठे ही काम करण्यास पाठवू शकतो.

13.07 अजाणतेपणी कुठलीही चूक झाल्यास रे.भ.बो. जवाबदार नाही पण त्यावर विचार करुन योग्य निर्णय घेण्याचा अधिकार रे.भ.बो. ला आहें.

13.08 या रोजगार सूचने संदर्भात कुठलीही न्यायालयीन कार्यवाही केवल केंद्रीय प्रशासनिक न्यायालय बैंच, ट्रिब्युनल च्या अधिकारक्षेत्रात जे. त्या रे.भ.बो. च्या निकट असेल अशा ठिकाणीचं होईल.

13.09 मराठी जाहीराती मधील अंटि / नियमा विषयी च्या कुठल्याही प्रकारच्या विवादासाठी, इंग्रजी प्रतच ग्राहय धरली जाईल.

14. छद्मीपणा / सत्य परिस्थिती लपविणे / धोक्याची सूचना

14.01 कोणत्याही उमेदवाराने परिक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी कोणत्याही स्तरावर छद्मीपणा किंवा इतर व्यक्तिची मदत घेऊ नये. तसे केल्यास त्याची उमेदवारी रदद केली जाईल व सर्व रे. भे. बो. तून होणा-या परिक्षेत बसण्यास मनाई केली जाईल व रेल्वेत भर्ती होण्यावर आजीवन बंदि घातली जाईल. अधिक न्यायालयीन कार्यवाही केली जाईल.

14.02 खोटि प्रमाण पत्रे जोडणे किंवा सत्य परिस्थिती लपवून ठेवून परिक्षेस योग्य असल्याचा भास करणारे किंवा परिक्षेस बसण्यास मिळणा-या मोफत प्रवास सवलतीचा दुरुपयोग करणा-यांचे अर्ज बाद केले जातील. पुढे त्यांच्यावर रे.भ.बोर्डातून होणा-या परिक्षेत बसण्यास 2 वर्षाच्या कालावधीसाठी बंदि घातली जाईल आवश्यकता भसल्यास न्यायालयीन कार्यवाही करण्यात येईल.

14.03 अर्जदारावर किंवा उम्मेदवारावर खालील कारणास्तव बंदि घालण्यात येऊ शकते.

i) एकाच पदासाठी एकापेक्षा जास्त अर्ज पाठविणे

ii) एकाच पदासाठी वेगवेगळया जाती सह एकापेक्षा जास्त अर्ज पाठविणे

iii) वेगवेगळे फोटो लावून एकाच पदासाठी एकापेक्षा जास्त अर्ज पाठविणे

iv) वेगवेगळी प्रमाण पत्रे लावून एकाच पदासाठी एकापेक्षा जास्त अर्ज पाठविणे

14.04 कोणताही उमेदवार गैर मार्गाचा अवलंब करित असेल किंवा आपल्या जागी दुस-या व्यक्तिस परिक्षेत बसण्यास पाठवित असेल तर त्याच्यावर रे.भ.बोर्ड द्वारे घेतल्या जाणा-या परिक्षेस बसण्याला बंदि घातली जाईल. सोबत रेल्वेत भर्ती होण्यावरसुध्दा बंदि घातली जाईल. असे उमेदवार न्यायालयीन कार्यवाहीस पात्र ठरतील.

14.05 खोटी माहिती पुरविणे किंवा सत्य परिस्थिती लपवून ठेवणे जर भविष्यात कोणत्याही स्तरावर सिध्द झाले तर अशांची नियुक्ति रद्द केली जाईल.

14.06 धोक्याची सूचना :

कपटी माणसापासून सावध रहावे.

खोटी आश्वासने देऊन रेल्वेत भर्ती करणा-यां व्यक्तिपासून सावध रहावे.

रेल्वे भर्ती बोर्डा द्वारे किंवा रेल्वे भर्ती बोर्डासाठी कोणताही एजेंट किंवा कोचिंग सेंटर नेमलेले नाहीं. अशा व्यक्तिंपासून उमेदवाराने सावध रहावें. उमेदवारांची निवड फक्त परिक्षेतील प्राप्त गुणांच्या आधारे होते.

खोटी आश्वासने देणा-या माणसांच्या जाळयात फसू नये.

रेलवे भर्ती बोर्डात वशिला लावणा-या उमेदवारांना अयोग्य घोषित केले जाईल किंवा त्यांच्या विरुद्ध न्यायालयीन कार्यवाही केली जाईल.